महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

थोर क्रांतिकार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या स्मारकाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१) १५७२ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या स्मारकाचे काम सन २००८ साली सुरु झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) अद्याप स्मारकाचे काम पूर्ण झाले नसल्यास, विलंबाची कारणे वा सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे (१८-०२-२०१५) :(१), (२) व (३) सदर स्मारकाचे काम विभागामार्फत सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सुरु करण्यात आले होते. तथापि, कामाबाबत प्राप्त तक्रारीमुळे काम थांबविण्यात आले. तद्नंतर जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे याबाबत झालेल्या बैठकीमध्ये सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांनी करावे असे ठरले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाची तीन वेळा निविदा प्रसिध्द करूनही त्यास प्रतिसाद न दिल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने काम करण्यास नकार दिला. तद्नंतर ग्रामपंचायत राजगुरुनगर यांनी सदर काम करण्यास प्रथम स्वारस्य दाखविले मात्र नंतर प्रतिसाद दिला नाही. यामुळे सदर कामास बराच विलंब झाला. सद्यस्थितीत सदर काम पुरातत्व विभागामार्फत दिनांक २४ मार्च, २०१४ पासून करण्यात येत असून ते प्रगतीपथावर आहे.

पुणे शहरातील वाढते प्रदुषण नियंत्रित करणेकरिता तातडीने उपाययोजना करणेबाबत

(२) ४२१६ (१५-०१-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये वाहनाची संख्या मागील तीन वर्षाच्या सरासरी पेक्षा दुप्पटीने वाढ झाल्याने पुणे शहरातील प्रदुषण पातळीने अति धोकादायक मर्यादाही ओलांडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषण पातळी अतिधोकादायक झाल्याने पुणे शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊन श्वसनाचे विकाराचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय ?

(३) असल्यास, पुणे शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी पुणे मनपाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-११-२०१५) :(१) पुणे शहरामध्ये मागील ३ वर्षाच्या सरासरीत वाहनांच्या संख्येत सुमारे ८% एवढी वाढ झालेली आहे, हे खरे आहे,

(२) व (३) मागील ३ वर्षात पुणे शहरात श्वसनाच्या विकाराने बाधीत रुग्णसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही, तसेच श्वसनाच्या विकाराचे मूळ कारण केवळ हवेतील प्रदूषण हे नाही प्रदूषण कमी करण्यासाठी महानगरपालिकेने सी.एन.जी. किट बसवणाऱ्या ऑटोरिक्शांच्या परमीट धारकांना प्रत्येकी रुपये १२०००/- चे अनुदान देणे, वाहतुक सुधारणा करणे, स्मशानभूमीत प्रायोगिक तत्वावर प्रदूषण नियंत्रक वूड फायर चिमणी बसविणे, वृक्षारोपण करणे इत्यादी उपाय योजिले आहेत, तर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जनजागृतीसह विवक्षीत प्रदूषण विषयक मानके उत्तीर्ण करणाऱ्या वाहनांची नोंदणी करणे, वायूप्रदूषण तपासणी केंद्र स्थानक करणे व P.U.C.नसलेल्या वाहनांवर कारवाई करणे रस्ता सुरक्षा पंधरवडा यासारखे उपाय योजिले आहेत,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरज (जि.सांगली) तालुक्यातील पुरवठा विभागाकडून सर्वसामान्य जनतेची होत असलेली अवहेलना

(३) ४४५७ (२३-१२-२०१४). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) तालुका पुरवठा विभागाकडून सर्वसामान्य जनतेची अवहेलना सुरू असुन नवीन रेशनकार्ड अथवा विभक्त रेशनकार्ड काढण्यासाठी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांकडून शिधापत्रिकाधारकांना विनाकारण आधार कार्ड घेऊन येण्याची सक्ती केली जात असल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायद्यामध्ये कोणतीही तरतुद नसताना केवळ त्रास देण्याच्या हेतुनेच अशी अट घातली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (२८-०१-२०१५) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात स्वस्त धान्य दुकानांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिधापत्रिका वाटपातील गैरव्यवहार

(४) ४६७८ (१५-०१-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिधापत्रिका वाटपात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होत असून अनेक सधन कुटूंबांना केशरी आणि पिवळ्या शिधापत्रिका देण्यात आल्याचे तसेच वितरीत करण्यात आलेले धान्य लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच केशरी व पिवळ्या शिधापत्रिकांमध्ये समाविष्ट असलेले सधन कुंटुंब रेशन दुकानातील धान्य घेत नसल्याने ते धान्य रेशन दुकानदाराला मिळते अशा प्रकारे अनेक रेशन दुकानदार कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ओहत?

श्री. गिरीश बापट (१८-०२-२०१५) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाई (जि.सातारा) तालुक्यात येथील शिधापत्रिकाधारकांना युनिट प्रमाणे धान्य, रॉकेलचे वितरण होत नसल्याबाबत

(५) ४७३६ (१५-०१-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (जि.सातारा) तालुक्यात येथील शिधापत्रिकाधारकांना युनिट प्रमाणे धान्य, रॉकेल यांचे वितरण होत नसल्याच्या अनेक तक्रारी तहसिलदार वाई यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०५-०२-२०१५) :(१) मौजे बोरगाव बु. ता.वाई येथील गावामध्ये रास्तभाव दुकानदार श्री.धोंडू मलू भोज यांचेकडून एपीएल कार्डधारकांना धान्य मिळत नसल्याबाबत सक्षम तहसीलदार यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२) होय.

(३) यामध्ये एपीएल कार्डधारकांना धान्य मंजूर नियतन व उपलब्धतेनुसार वितरण केले नसल्याचे आढळून आल्याने संबंधित रास्तभाव दुकानदार श्री.धोंडू मलू भोज, मौजे बोरगाव बु., ता.वाई यांचेवर धान्याचा अपहार केल्याबाबत जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार भाग ६ गु.र.नं. ५३ /१४ अन्वये फौजदारी गुन्हा वाई पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला असून जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा यांच्या दि.२७ नोव्हेंबर, २०१४ च्या आदेशानुसार परवाना पत्र रद्द करण्यात आले आहे. सदर दुकानाच्या शिधापत्रिका लगतच्या दुकानास जोडण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाने लागू करण्यात आलेल्या उद्योगांसाठी लागणारी पर्यावरणविषयक नवीन मार्गदर्शक तत्वांना विरोध दर्शविल्याबाबत

(६) ५९३४ (०६-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने उद्योगांसाठी लागणारी पर्यावरणविषयक मंजुरीची अट शिथिल करुन नवीन मार्गदर्शक तत्वे लागू केल्यामुळे सदर नवीन मार्गदर्शक तत्वांना राज्याचे मा. पर्यावरण मंत्री यांनी शासनाकडे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे तीव्र विरोध दर्शविल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच प्रश्न भाग (१) बाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. रामदास कदम (२१-११-२०१५) :(१) मा.मंत्री (पर्यावरण) यांनी १६/०१/२०१५ च्या पत्रान्वये पर्यावरणाची हानी करणा-या कारखांन्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अधिकार राज्य शासनाला असण्याची आवश्यकता असल्याची प्रतिपादन करणारे पत्र लिहिले आहे, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने पारीत केलेले पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ व हवा (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ हे कायदे व त्या अंतर्गत निर्गमित झालेल्या अधिसूचना, अधिनियम व कार्यालयीन ज्ञापने यानुसार कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे.

राज्य शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत दुगाड फाटा,
भिवंडी येथे उभारलेले भात खरेदी केंद्र पूर्ववत करण्याबाबत

(७) ८३८५ (०४-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत दुगाड फाटा, भिवंडी येथे उभारलेले भात खरेदी केंद्र बंद झाल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भात खरेदी केंद्र बंद करण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर भात खरेदी केंद्र पूर्ववत करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, कधीपर्यंत,
(५) तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या मालकीच्या २२ एकर जागेपैकी काही जागा महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केट फेडरेशन धान्याचा साठा करण्यासाठी दुगाड फाटा येथे पाच प्रशस्त अशी गोदामे उभी केली आहेत, हेही खरे आहे काय,
(६) असल्यास, ही गोदामे कोणत्या कंपनीला भाडयाने दिले आहे व यातून शासनाला किती भाडे मिळते,
(७) असल्यास, धान्य ठेवण्यासाठी जागा नसताना खाजगी कंपनीला जागा भाडयाने देण्याचे नेमके कारण काय आहे ?

श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :(१) व (२) हे खरे आहे.
कोकण विभागातील हंगाम २०१३-२०४ मधील धानाची भरडाईसाठी उचल न झाल्याने गोदामाअभावी धान खरेदी बंद होती.

(३) व (४) जिल्हा मार्केटिंग कार्यालय, ठाणे यांनी दि.०२.१२.२०१४ रोजी धान खरेदी केंद्र सुरु केले आहे तसेच दि.३० जून २०१५ पर्यंत धान खरेदी करण्यात येणार आहे.

(५) कृषि उत्पन्न बाजार समितीने मार्केटिंग फेडरेशनला राईस मिलसाठी जागा दिली होती. त्यामध्ये प्रथम ३ गोदामे बांधली व सुखदा निर्मिती योजनेंतर्गत उत्पादित उत्पादनाच्या साठवणूकीकरिता २ गोदामे अशी एकूण ५ गोदाम बांधली आहेत.

(६) पणन महासंघाने कोकाकोला कंपनीला सदरील ३००० मे. टन क्षमतेचे गोदाम भाडयाने दिले आहे. सदरील भाडयातून शासनास काहीही भाडे मिळत नाही.

(७) धान साठवणूकीसाठी २००० मे.टन क्षमतेचे गोदाम उपलब्ध केले असून उर्वरित गोदाम खाजगी कंपनीला भाडयाने दिले आहे.

खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघातील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गावयोजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत

(८) ८४८१ (०७-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघातील खारपणा पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गांवे योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, खामगांव यांनी दि. २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे पत्राव्दारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारपाण पट्टयातील गांवे वरील योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०५-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) १४० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दिनांक ०२.१२.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे.

प्रस्तुत योजनेत विधानसभा सदस्यांच्या मागणीनुसार गावे समाविष्ट करणे तांत्रिकदृष्टया व आर्थिकदृष्टया योग्य होणार नसल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अकोला यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे अन्न सुरक्षा यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या केशरी शिधापत्रिकांधारकांना शासन निर्णयाप्रमाणे धान्य वितरीत करण्याची मागणी

(९) ८५३४ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे अन्न सुरक्षा यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या केशरी शिधापत्रिकांधारकांना शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ प्रमाणे किमान १० किलो गहू व ५ किलो तांदूळ असे १५ किलो धान्य वितरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धान्य वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :(१) राज्य अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत लाभ मिळण्यास पात्र नसलेल्या ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्याबाबतची मागणी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभ मिळण्यास पात्र नसणा-या ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात माहे मे, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले आहे. या पुढील कालावधीसाठी सदर शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून अनुदानित दराने/ सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ द्यावा किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्यासमोर विचारार्थ ठेवण्यात येत आहे.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील नवीन गोदाम बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(१०) ८५४८ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत नवीन गोदाम बांधकामाचा प्रस्ताव गत अनेक वर्षपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील अन्नधान्य नियतन व उपलब्ध साठवणूक क्षमता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी वेळोवेळी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गोदाम बांधकामास विलंब होण्याची कारणे काय आहेत व केंव्हा पर्यंत बांधकाम सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :(१) होय

(२) होय

(३) व (४) गोदाम बांधकामाच्या कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्हयासाठीचे उद्दिष्ट जवळपास पूर्ण झालेले असल्याने तूर्तास इचलकरंजीसह कोल्हापूर जिल्हयातील ८ ठिकाणच्या गोदाम बांधकामाचे प्रस्ताव प्रलंबित ठेवले आहेत.

भुसावळ (जि.जळगांव) येथे सहकार कायद्याखाली नोंदणी नसतानाही स्वस्त धान्य दुकान व केरोसिन डेपो चालवित असल्याबाबत

(११) ८५५५ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथे स्वस्त धान्य दुकान व केरोसिन डेपो चालविण्याबाबत संस्थेच्या पोटनियमात तरतुद नसतानाही जनता को.ऑ.कंझ्युमर सोसा. रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक संस्था, जतन महिला औदयो. उत्पादन सह.संस्था, महालक्ष्मी माता महिला सह. औद्यो.संस्था,अफसाना महिला उदयोग उत्पादक संस्था इत्यादी संस्था सदर व्यवसाय बऱ्याच वर्षापासून करीत असून शासकीय धान्याची उचल करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच भुसावळ (जि.जळगांव) येथे सहकार कायद्याखाली नोंदणी नसतानाही रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक संस्था, अफसाना महिला उद्योग संस्था स्वस्त धान्य दुकान व केरोसीन डेपो सवर्ण व्यक्तीमार्फत चालवून अनधिकृतरित्या शासकीय धान्याची उचल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असंल्यास, उक्त संचालकांच्या जाती व धर्मांची पडताळणी शासनाद्वारे करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या संस्था चालकांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :(१) (अ) जनता को.ऑ.कन्झुमर सोसायटी ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या केरोसिन परवान्याबाबतचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे व केरोसिनचा कोटा इतरत्र जोडण्यात आलेला आहे.

(ब) रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानदारांचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले होते.

मात्र संस्थेच्या पुनर्निरीक्षण अर्जावर उप आयुक्त (पुरवठा) नाशिक यांनी दिलेल्या आदेशानुसार स्वस्तधान्य दुकान चालविण्यात दिलेले आहे.

(क) जतन महिला औद्योगिक उत्पादक संस्था ही नोंदणीकृत संस्था असून स्वस्त धान्य दुकान चालविण्यास संस्थेने असमर्थ असल्याचे कळविल्यानुसार दुकान तात्पुरत्या स्वरुपात इतर दुकानदाराकडे चालविण्यास ठेवले आहे.

(ड) महालक्ष्मी माता सहकारी औद्योगिक संस्था ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानाची पुरवठा अधिकारी, जळगाव यांनी तपासणी केली असता स्वस्त धान्य दुकानात दोष आढळल्याने संबंधित संस्थेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यावर सदर प्रकरणी दिवाणी न्यायालय भुसावळ यांनी दिलेल्या निकालानुसार सदर परवाना पूर्ववत सुरु करण्यात आला आहे.

(ई) अफसाना महिला उद्योग सोसायटी ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानदांराचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले होते. त्याविरुद्ध त्यांनी मा.उच्च न्यायालय येथे याचिका दाखल केली आहे.

त्यावरील मा. उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ यांची आदेशानुसार सदर स्वस्त धान्य दुकान तात्पुरत्या स्वरुपात स्वस्त धान्य दुकानदाराकडे प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत चालविण्यास ठेवले आहे.

(२) रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक संस्था यांना सहायक निबंधक यांनी नोंदणी प्रमाणपत्र दिले असून धान्याची उचल करते व अफसाना महिला उद्योग सोसायटी ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानदाराचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले होते.

तथापि, मा.उच्च न्यायालय, औरगांबाद खंडपीठ यांचे आदेशानुसार सदर स्वस्त धान्य दुकानदाराकडे प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत चालविण्यास ठेवले आहे.

(३) बचत गट/ सामाजिक संस्थाना स्वस्त धान्य व केरोसिन परवाने मंजूर करताना जात/धर्म याची पडताळीणी करणे गरजेचे नाही.

(४) उत्तर भाग १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्राहक न्यायालयातील ४१ सदस्य न्यायधिश ४०० रुपये रोजंदारी पध्दतीने काम करीत असल्याबाबत

(१२) ८५७२ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्राहक न्यायालयातील तब्बल ४१ सदस्य न्यायधिश ४०० रुपये रोजाने म्हणजेच रोजंदारी पध्दतीने काम करीत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी शासनास दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी अदयापी शासनाकडून करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पगार व केंद्रीय मंत्र्यांनी निर्धारीत केलेले लाभ सदर न्यायाधिशांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :(१), (२), (३), (४) व (५) दि.१५.१२.२०१४ च्या शासननिर्णयान्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील पूर्णकालीन सदस्यांना रु.१०,०००/- वरुन रु.४०,०००/- प्रति महिना मानधन व अंशकालीन सदस्यांना प्रति दिन प्रति बैठक रु.५०० वरुन रु.१०००/- मानधन व रु.३००/- वाहनभत्ता तसेच जिल्हा ग्राहक मंचाच्या पूर्णकालीन सदस्यांना रु.८०००/- वरुन २०,०००/- इतके मानधन व अंशकालीन सदस्यांना प्रतिदिन प्रति बैठक रु. ४००/- वरुन रु.६००/- मानधन व रु. १५०/- वाहनभत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

जालना जिल्ह्यात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे वितरित करण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्यांचा झालेला गैरव्यवहार

(१३) ८६८५ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यात दोन वर्षापूर्वी पडलेल्या दुष्काळाच्यावेळी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे वितरित करण्यात आलेल्या सुमारे दिड हजार पाण्याच्या टाक्यांचा कोणताही ताळमेळ लागत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्याचवेळी सलमान ट्रस्टकडूनही ५०० टाक्या देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाण्याच्या टाक्या वितरणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२८-०५-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) होय, श्री.सलमान खान यांच्या बिईंग ह्युमन ट्रस्टकडून ५०० टाक्या प्राप्त झाल्या होत्या.
(३) पाण्याच्या टाक्या वितरणात गैरव्यवहार झालेला नसल्याने पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अन्न सुरक्षा अभियानात सर्व कुटुंबाचा सरसकट समावेश करण्याची मागणी

(१४) ८७५१ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न सुरक्षा अभियानात सर्व कुटुंबाचा सरसकट समावेश करण्याची मागणी राज्यातील सर्व स्तरातून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

चिंचवड (जि.पुणे) येथील कुदळवाडी मोरे वस्ती भागातील गोदामातून सोडण्यात येणा-या रसायन मिश्रीत पाण्याने शेकडो माशांचा झालेला मृत्यू

(१५) ९२२२ (०६-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवड (जि.पुणे) येथील कुदळवाडी मोरे वस्ती भागातील गोदामातून सोडण्यात येणा-या रसायन मिश्रीत पाण्याने जलचर जीवासह शेकडो माशांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे यापूर्वी चार वेळा अशा घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ विभाग आणि पालिकेचा पर्यावरण विभाग यांच्याकडून संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :(१) दिनांक १८/१२/२०१४ रोजीच्या दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात मासे मरतुकी झाल्याबाबत प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत कुदळवाडी चिखली घाट व परिसराची पाहणी केली असता मासे मरतुकी झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या तयार केलेल्या संयुक्त पथकामार्फत सदर भागाची पाहणी करण्यात आली आहे. पाहणीअंती

पर्यावरण विषयक नियमांचे पालन न करणाऱ्या विविध उद्योगांवर, उद्योग बंद करण्याचे निर्देश बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाडळसे (ता.यावल, जि.जळगांव) येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेबाबत

(१६) १०८४८ (०७-०४-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडळसे (ता.यावल, जि.जळगांव) येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर शासनाचा निधी खर्च होऊनही अद्याप काम पुर्ण झालेले नाही तसेच झालेले कामही निकृष्ट दर्जाचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने जबाबदार अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१५-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषद स्तरावरुन चौकशी करण्यात आली असून तांत्रिक अडचणीमुळे कामे पूर्ण करण्यास विलंब झाल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्या अंतर्गत परवाने देण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

(१७) १०८५६ (०६-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्या अंतर्गत परवाने देण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्याचा निर्णय घेऊनही राज्यात अन्न व प्रशासन विभागाने याची अंमलबजावणी केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर पालिकेने त्यांचे कार्यक्षेत्रातील परवाने देण्याबाबतचे अधिकार मिळावेत, अशी मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका , पुणे यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका यांना पदावधित अधिकारी म्हणून नेमणूक करुन त्याबाबत अधिसुचना प्रसिध्द करण्याबाबत विनंती केली आहे.
(३) संपूर्ण देशात अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ लागू झालेला असून, त्यांची अंमलबजावणी एकाच विभागामार्फत अपेक्षित असल्याने,महाराष्ट्र राज्यात ती अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येते.

याविषयी पुणे एम्प्लॉयीज असोसिएशन, पुणे यांनी रिट याचिका क्र. ९५२८/२०१३ मा.मुंबई उच्च न्यायलयात दाखल केली आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेचे श्री.घडामोडे यांनीही मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्र.९१६६/२०१४ ही दाखल केली असून दोन्हीही याचिका प्रलंबित आहेत.
(४) लागू नाही.

उस्मानाबाद जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सौरऊर्जेवर आधारित दुहेरी पंप पाणीपुरवठा योजनेबाबत

(१८) ११०३४ (०७-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेच्या सौरऊर्जेवर आधारित दुहेरी पंप पाणीपुरवठा योजनेंतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये सुमारे १७ ते १८ दुहेरी नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्या असता फक्त ८ योजनांचे खोदकाम करण्यात आले असून सदर काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर योजनेचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२०-०६-२०१५) :(१) अशंत: खरे आहे.
उस्मानाबाद जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या सौरऊर्जेवर आधारीत दुहेरी पंप पाणी पुरवठा योजनंतर्गत सन २०१४-१५ मध्ये १७ गावात १८ नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली. सदर योजनेचे काम ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येत आहे. सर्व योजनेचे काम प्रगतीपथावर असून १३ योजनांचे सौर पंपाची उभारणी व खोदकाम पुर्ण झाले आहे. ४ योजनांचे खोदकाम करण्यात आले असून पंप उभारणीची कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरित एका योजनेचे काम प्रगती पथावर आहे.
(२) उक्त प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर आढावा घेण्यात आला आहे.

(३) व (४) राज्यात दर करारावर फक्त ३ पुरवठा धारक असल्याने व त्यांच्याकडून संपूर्ण राज्यात कामे होत असल्याने विलंब होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीने स्वतंत्र निविदा मागवून कामे हाती घेण्यास मुभा देण्यात आली. तथापि संबंधित एजन्सीकडून तातडीने दखल घेण्यात येवून योजनेचे काम तत्परतेने करण्यात येत आहे.

रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील गावांना शुध्द पाणी पुरवठा करणारी योजना वीज बील थकित असल्याने बंद असल्याबाबत

(१९) ११०९० (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील १४ गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता असलेली योजना ४,६१,८५० रुपयांचे वीज बिल थकित असल्यामुळे मागील काही दिवसांपासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजनेचे वीज बिल थकीत असण्याची कारणे काय आहेत , तसेच रामटेक पंचायत समिती मध्ये माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान पाणी टंचाई संदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत कोणकोणत्या समस्या सोडविण्यात आल्या आहेत,

(३)असल्यास, सदर थकीत वीज बील तातडीने भरुन योजना पुन्हा सुरु करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही योजना सुरु करण्यासंदर्भात व प्रश्न भाग (२) मधील उर्वरित समस्या सोडविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१६-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) १४ गावांपैकी फक्त दोन गावे शितलवाडी, परसोडा व नगरपरिषद रामटेक पाणी घेत असल्यामुळे खर्चाच्या प्रमाणात पाणीपट्टी वसुली होत नाही. तथापि, १० टक्के विज बिल भरुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) होय.

(४) थकित विद्युत देयकाचे १० टक्के रक्कम विद्युत विभागाकडे भरुन व आवश्यक दुरुस्ती करुन बंद योजना दिनांक ०४.०५.२०१५ पासून शिखर समिती मार्फत पुन:श्च नियमितपणे सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील भीमा नदीचे पाणी प्रदुषित झाल्याबाबत

(२०) १११८० (०६-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रात जलपर्णी या वनस्पतीची मोठया प्रमाणात वाढ झाल्याने नदी प्रदूषित झाली असल्याचे माहे डिसेबर,२०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने भीमा नदी प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा तयार करूनही अनेक वर्षे झाली असून यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्र शासनाने सन २०१५ हे जलक्रांती वर्ष म्हणून जाहिर केले असून या वर्षात राज्यातील नद्यांच्या शुध्दीकरणासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना आखली वा आखण्यात येणार आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने भीमा नदी आणि राज्यातील नद्यांच्या शुध्दीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत पुणे शहराच्या सादर प्रस्तावावर केंद्र शासनाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) भिमा नदी व तिच्या उपनद्यांचे प्रदूषण रोखणे कामी जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत झाली असून समितीच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व म.प्र.नि.मंडळा मार्फत संयुक्तरित्या भिमा नदी प्रदुषण नियंत्रण करण्यासाठी सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील औष्णिक विद्युत केंद्राच्या धुरातून निघणा-या घातक सल्फर बाबत

(२१) १११८५ (०६-०४-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील औष्णिक विद्युत केंद्राच्या चिमणीमधून निघणा-या धुरामध्ये आरोग्याला घातक असलेले सल्फरचे प्रमाण आहे व या सल्फरचे डिस्ल्फरायझेशन करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा घातक हवेत असणारा वायुरुपातील सल्फर पावसाळ्यातील दमट हवामानात सल्फुरीक ॲसीडमध्ये रुपांतरीत होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील बहुतेक सर्वच औष्णिक विद्युत केंद्र हे शहराला लागून असल्यामुळे या सर्व चिमण्यांवर फ्लु गॅस डीस्ल्फरायझेशन (flu gas disupherisation) ची प्रक्रिया करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, पर्यायी उपाययोजना कोणती आहे ?

श्री. रामदास कदम (१४-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

विदर्भातील औष्णिक विद्युत केंद्रामध्ये वापरण्यात येणाऱ्या इंडियन कोळशांमध्ये सल्फरडाय ऑक्साइड उत्सर्जन प्रमाण विहीत मर्यादेत आढळून येत असल्यामुळे सल्फर डिस्ल्फरायझेशन संयत्रणा बसविण्याची आवश्यकता नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जुईनगर (नवी मुंबई) येथील कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या धूराचा व दुषित सांडपाण्यामुळे सानपाडा-जुईनगर येथील रहिवाश्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

(२२) १५२१३ (०६-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुईनगर(नवी मुंबई) औद्योगिक पट्टयामध्ये असलेल्या कंपन्यांमधून मध्यरात्रीनंतर धूर सोडण्यात येत असून या धूरांचा व दुषित सांडपाण्यामुळे सानपाडा-जुईनगर येथील रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास विजय वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-११-२०१५) :(१) एका नागरिकाचे निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे,

(२) जुईनगर कार्यक्षेत्रात बहुतांश भाग हा रहिवासी स्वरुपाचा असून तेथे एकही मोठा अथवा मध्यम स्वरुपाचा कारखाना कार्यरत नाही. प्रश्नाधीन कालाच्या सुमारास आलेल्या एका बातमीच्या अनुषंगाने पाहणी केली असता जुईनगर रेल्वे स्थानकाच्या परिसरातील नाल्यात घरगुती सांडपाणी, प्लास्टिक कचरा अशा टाकाऊ पदार्थ साचून राहिल्याचे आढळून आले. तसेच तीन कारखान्यांचे सांडपाणी नाल्यात मिसळत असल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मे.एस.आय.ग्रुप इंडिया लि. एम.आय.डी.सी. तुर्भे या कारखान्याची ५ लाखाची बँक हमी जप्त केली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी, जिंतूर व सेलु (जि.परभणी) तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या धान्याचा होत असलेला काळाबाजार

(२३) १६२४९ (२०-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)परभणी, जिंतूर व सेलू (जि.परभणी) तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणारे धान्य, रॉकेल व इतर जीवनावश्यक वस्तू काळ्या बाजारात विकण्यात येत असल्याच्या तसेच सदर धान्य बेकायदेशीरपणे गोदामात साठवून ठेवण्याच्या सन २०१० पासून आतापर्यन्त किती घटना निदर्शनास आल्या आहेत,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असलेले संबंधित अधिकारी, शिधावाटप दुकानदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोरगरीब जनतेला नियमितपणे धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१५) :(१) परभणी,जिंतूर व सेलू तालुक्यात सन २०१० ते मार्च, २०१५ पर्यंत रास्तभाव दुकान व केरोसिन संबंधी १३० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) गुन्हे दाखल झालेला प्रकरणी रु.२,८५,४२,५००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २३५ व्यक्तीना अटक करण्यात आले आहे. तसेच ९५ रास्तभाव दुकान परवाने निलंबित करण्यात आले असून ३५ दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले आहे. या प्रकरणी १,१९,०००/- इतकी अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच ९७ किरकोळ केरोसिन परवाने निलंबित करण्यात आले असून १८ किरकोळ केरोसिन परवाने रद्द करण्यात आले आहे. या प्रकरणी रु.३,६१,०००/- इतकी अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच तत्कालिन संबंधित नायब तहसिलदार यांना निलंबित करुन त्याच्या विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करुन त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखून ठेवणेची शिक्षा देण्यात आली आहे.

(३) परभणी जिल्हयात दर सहा महिन्यातून एकदा सर्व रास्तभाव दुकान व किरकोळ केरोसीन परवानाधारक यांच्या अभिलेख तपासण्या करण्यात येतात व दोषी रास्तभाव दुकानावर दोषाच्या अनुषंगाने निलंबित/रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईच्या पर्यावरणाचा कृती आराखडा तयार करण्याबाबत

(२४) १६२६५ (२०-०५-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संपूर्ण महानगरक्षेत्रात कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे लावली जात नाही,

सांडपाणी थेट समुद्रात सोडले जाते, ध्वनी व वायु प्रदुषण वाढत असल्याबाबत संसदेच्या वने व पर्यावरण समितीने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्राच्या संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहराची अवस्था आणखी खालावू नये, याकरिता कोणत्या उपाययोजना करणार आहात याबाबतचा कृती अहवाल दोन आठवड्यात सादर करण्यास सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,

(४) असल्यास, कृती आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे व कोण करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०२-०७-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५)

संसदेच्या वने व पर्यावरण समितीने दि. ३० जानेवारी, २०१५ च्या सुमारास मुंबई शहरातील घनकचरा, सांडपाणी,ध्वनी व वायु प्रदूषण यासंबंधी माहिती घेण्यासाठी मुंबई येथे भेट दिली होती. सदर भेटीच्यावेळी समितीने पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, इतर शासकीय विभागातील अधिकारी व शासकीय/अशासकीय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली होती. या चर्चेच्या दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी संबंधीत माहिती/टिप्पण्या सदर समितीस देण्यात आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे इतरही संस्थांकडून सदर समितीस, त्यांच्या विभागाची माहिती पुरविण्यात आलेली होती. यासंबंधी अंतिम अहवाल सदर समितीमार्फत केंद्र शासनाच्या पातळीवर बनविण्यात येत आहे.

बुलढाणा, अकोला व वाशिम शहरामध्ये गॅस सिलेंडरचा पुरवठा होत नसलेल्याबाबत

(२५) १७२८४ (३१-०७-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने जळावू लाकूड वापरावर बंदी आणल्याने ग्रामीण भागात गॅस सिलिंडरचे ग्राहक वाढत आहेत परंतू बुलढाणा, अकोला, वाशिम शहरामध्ये नोकरीच्या निमित्ताने आलेले अनेकजण भाड्याने राहत असल्याने त्यांच्याकडे निवासी पुरावा नसल्याने गॅस नोंदणी केल्यानंतर गॅस मिळविण्यासाठी गैरसोय होत आहे म्हणजेच गॅस सिलिंडरचे ग्राहक वाढत असूनही पुरवठा होत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोणार (जि.बुलढाणा) शहरातील धारातीर्थ, पापटेश्वर, कुमारेश्वर, राम गया मंदिर यासह पुरातन वास्तुची झालेली दुरवस्था

(२६) १७३१२ (०६-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) शहरातील धारातीर्थ, पापटेश्वर, कुमारेश्वर, राम गया मंदिर यासह सरोवरावरील पुरातन मंदिर व स्वामी मंदिर परिसरात पुरातन वास्तुची पडझड झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखो रुपये खर्चुनही गत चार वर्षापासून धारातीर्थाच्या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असुन उक्त परिसरात ठिकठिकाणी कचरा, घाण साचली असुन मोठ्या प्रमाणात पुरातन वास्तु व मंदिरे असतांना केवळ दोन कर्मचारी देखभालीसाठी आहेत याबाबत पर्यटन प्रेमी व इतिहास तज्ञांनी पुरातत्व विभागाला तोंडी व लेखी कळविले असूनही याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) सदर वास्तु राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय नागपूर यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद् यांनी कळविल्यानुसार हे खरे नाही.
(२) गायमुख कुंड आणि मंदिरांची कामे उपलब्ध निधीतून केले गेले आहे तसेच स्मारकांच्या देखरेखीसाठी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली असल्याचे अधिक्षक पुरातत्वविद् यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धोबी तलाव येथील रंगभवन थिएटरची डागुडजी करण्याबाबत

(२७) १७५५४ (३१-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धोबी तलाव येथील रंगभवन थिएटर गत १२ वर्षापासून धुळखात पडले असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील थिएटरच्या डागडुजीकडे सांस्कृतिक विभागाने जाणूनबुजून दुर्लक्ष केले असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रंगभवन थिएटर तातडीने डागुडजी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) नाही.

(२) नाही.

(३) रंगभवन हे खुले नाट्यगृह असून मा. उच्च न्यायलयाच्या दि.२५.९.२००३ च्या आदेशानुसार शांतता क्षेत्र घोषित करण्यात आले असल्याने तेथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यास बंदी आहे. यास्तव डागडूजी करण्याची आवश्यकता नसून तेथे बंदिस्त नाट्यगृह बांधावे लागेल. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वैधमापन शास्त्र यंत्रणेचे कार्यालय रत्नागिरीच्या कार्यालयात विलीन करण्याचा निर्णय

(२८) १७८२५ (०६-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वैधमापन शास्त्र यंत्रणेचे कार्यालय रत्नागिरीच्या कार्यालयात विलीन करण्याचा निर्णय दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरीक, सामाजिक कार्यकर्ते व माजी सभापती पंचायत समिती यांनी सदरचे कार्यालय हलविण्यात येऊ नये व हलविल्यास आंदोलन, उपोषण करण्याचा इशारा दिनांक २ मे,२०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे व पत्राद्वारे जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड, दापोली व मंडणगड येथील व्यापा-यांनाही रत्नागिरीला यावे लागणार असून या व्यापा-यांनी ही कार्यालय हलविण्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०३-११-२०१५) :(१) सदर निर्णय शासनाने घेतलेला नाही. तत्कालीन नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांनी दुरध्वनीवरून दिलेल्या सूचनेनुसार उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभाग यांनी दिनांक २०.०४.२०१५ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.
(२) व (३) सदर विषयाबाबत डॉ.विजय श्रीधर नातू, रत्नागिरी यांचे दिनांक ०५.०९.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

दापोली व मंडणगड या तालुक्यांसाठी दापोली येथे निरिक्षक, वैध मापन शास्त्र हे स्वतंत्र कार्यालय असून सदर कार्यालय दोपाली येथेच कार्यरत आहे.
(४) व (५) निरीक्षक, वैध मापन शास्त्र यांच्या कार्यालयासाठी चिपळूण येथे जागा शोधण्याबाबतची कार्यवाही नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांच्यामार्फत सुरु आहे.

नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी
निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत

(२९) १८२६८ (०६-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभुमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास जागेच्या माहितीसह सादर केलेला सविस्तर प्रस्ताव माहे मे, २०१५ पर्यंत शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चित्रपटसृष्टीच्या भुसंपादनासाठी शासनाने दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी रु.१० कोटी निधी मंजुर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चित्रपटसृष्टीसाठी जमीनीचे संपादन करुन सदर चित्रपटनगरीचा प्रस्तावाच्या मंजुरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) नाही. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सविस्तर प्रस्ताव सादर केला नव्हता. असा सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे निर्देश महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी, नाशिक यांना जुलै, २०१५ मध्ये दिले आहेत.
(२) नाही. तथापि, दि. २७.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये नाशिक विभाग विकास कार्यक्रम-२००९ अंतर्गत चित्रनगरीकरीता भुसंपादनासाठी रु. १० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन दिला होता.

(३) नाशिक जिल्ह्यातील मौजे मुंढेगाव, तालुका इगतपुरी येथील सर्वे क्र. ४५९ क्षेत्र ५४.५८ हे.आर ही जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे करण्याबाबत महसूल व वन विभागाला विनंती करण्यात आली होती. त्या विभागाने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहेत.
(४) कार्यवाही सुरु आहे. विलंबाचा प्रश्न उपस्थित होत नाही.

कवलापूर(ता.मिरज,जि.सांगली) येथील काळू-बाळू लोकनाट्य तमाशा मंडळाला निधी नाकारल्याबाबत

(३०) १८३०० (३१-०७-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवलापूर (ता.मिरज,जि.सांगली) येथील काळू-बाळू लोकनाट्य तमाशा मंडळाला तमाशा कलेला प्रोत्साहन देण्यासाठी ३ वर्षातून एकदा मिळणा-या ८ लाख रुपयांच्या मदत निधीतून डावलले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू अनुदान तातडीने मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर योजनेखाली एकूण ९० संस्था पात्र ठरल्या होत्या. दि. १ जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयानुसार ८० कलापथकांना कमाल अनुदान रु.५०.०० लाख रक्कमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.त्यानुसार मागील आर्थिक वर्षात रु.५०.०० लाख रक्कमेच्या मर्यादेत ६१ कलापथकांना अनुदान देण्यात आले. त्यामुळे उर्वरित २९ कलापथकांना अनुदान देणे शक्य झाले नाही. सदर २९ कलापथकामध्ये काळू-बाळू तमाशा मंडळाचा समावेश होतो. आता उर्वरित २९ कलापथकांना अनुदान देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तरी सदर वस्तुस्थिती लक्षात घेता सदर मंडळाला डावलेले आहे, असे म्हणणे योग्य होणार नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वृध्द कलाकारांच्या मानधनात वाढ करण्यासंदर्भात

(३१) १९२७१ (०६-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृध्द कलाकारांना शासनामार्फत उदरनिर्वाह करण्यासठी १०००/- रुपये मासिक मानधन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात मासिक १०००/- रुपयांचे मानधन वृध्द कलाकारांना अपुरे पडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच माहे मार्च, २०१५ अखेरीस सदर साहित्यिक व कलावंतांना पूर्ण मानधनाचे वाटप शासनाच्या आदेशानुसार करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृध्द कलाकारांना मासिक मानधनात शासनाने दीडपटीने वाढ करण्याबाबत दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) व (२) या विभागाच्या दि. २२ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दि. १५ ऑगस्ट, २०१४ पासून कलाकारांच्या मानधनाच्या रक्कमेत दीडपटीने वाढ केली असून त्यानुसार "अ , "ब" व "क" या श्रेणीतील पात्र कलावंतांना अनुक्रमे रु. २१००/-, रु.१८००/- व रु. १५००/- याप्रमाणे दरमहा मानधन अदा करण्यात येते. तसेच सदर शासन निर्णयानुसार माहे जून, २०१५ अखेर मानधनाचे वाटप शासन शासनस्तरावरुन करण्यात आले आहे.

(३) कार्यवाही पूर्ण केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खोपोली (जि.रायगड) येथील पाताळगंगा नदी दुषित झाल्याबाबत

(३२) १९५२८ (३१-०७-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथील पाताळगंगा नदीमध्ये माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नदी पात्रालगत असलेल्या रासायनिक कारखान्यांनी व अल्टा किंवा ॲफसन्स या कारखान्याने दुषित रसायन सोडल्याने नदीच्या पात्रात सोडल्याने नदी पात्रातील तसेच मुळगांव परिसरातील नदीपात्रात मासे मरण्याच्या घटना वाढीस लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दूषित रसायनयुक्त पाण्यामुळे तसेच पाताळगंगा परिसरात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ढगाळ वातावरण आणि धुळीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांचे आरोग्यावर विपरीत परिणाम झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी कंपन्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२०-०९-२०१५) :(१) होय, हे खरे आहे,
(२) नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम झाले आहेत हे खरे नाही.
(३) मे, अल्टा लॅबोरेटोरिज व मे, ॲफसॉन इंडस्ट्रियल कॉरपोरेशन लि. या दोन उद्योगांनी संमतीपत्रातील अटीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याने मंडळाने सदर उद्योगांना अनुक्रमे कारण दाखवा नोटीस व कारखाना बंदचे आदेश बजावलेले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैधमापन शास्त्राच्या कक्षेत मोबाईल कंपन्यांना आणण्याच्या कार्यवाहीबाबत

(३३) २०५०३ (३१-०७-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्राहकांना विविध योजनांचे आमिष दाखवून आर्थिक लुट करणाऱ्या मोबाईल कंपन्यांना अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याच्या अखत्यारितील वैधमापन शास्त्राच्या कक्षेत आणण्यासाठी वैधमापन नियंत्रण अधिकारी श्री. संजय पांडे यांनी त्याबाबतीत कार्यवाही सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१५) :(१) होय, नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर सदर निर्णय घेऊन कार्यवाही सुरु केलेली आहे.
(२) व (३) मोबाईलवर संभाषण कलावधीचे (Call Duration) मोजमाप करण्यासाठी कोणते प्रमाण एकक वापरण्यात येते, कालावधीचे मोजमाप कसे केले जाते, तसेच सदर कालावधीचे मोजमाप करण्यासाठी कोणते उपकरण वापरण्यात येते आणि ते प्रमाणित करण्यात आले आहे किंवा कसे, याबाबत विविध मोबाईल सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांना नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी कळविले होते. तसेच त्यांनी दि. २० मे, २०१५ रोजी कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करुन उपरोक्त विषयाबाबत माहिती सादर करण्यासाठी कळविले आहे. माहिती अप्राप्त असल्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

राज्यातील उद्योगांमध्ये निर्माण होणा-या कच-यांची विल्हेवाट न लावणाऱ्या तसेच वायू प्रदूषण करणा-या कंपन्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण न करण्याचा निर्णय

(३४) २०७३८ (३१-०७-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगांमध्ये निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट न लावणाऱ्या तसेच वायू प्रदूषण करणा-या कंपन्यांवर पर्यावरण विभाग ऑनलाईन नजर ठेवणार असून दोषी आढळणा-या कंपन्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण न करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार भिवंडी शहरातील किती कंपन्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :(१) हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार, अति प्रदूषणकारी (१७ वर्गवारी) उद्योगांना, सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणांना, जैव वैद्यकीय कचरा व घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्राना इत्यादींना प्रक्रिया केलेल सांडपाणी व उत्सर्जित हवेतील प्रदुषित घटकांचे ऑनलाईन मोजमाप करण्यासाठी यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे.

(२) अति प्रदूषणकारी वर्गवारीतील कोणताही उद्योग सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, जैव वैद्यकीय कचरा व घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र भिवंडी शहरात नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ढेकू (ता.खालापूर,जि.रायगड) प्रिमिअर कंपनीतून रसायनाची होत असलेली गळती

(३५) २०९८२ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेकू (ता.खालापूर,जि.रायगड) येथील प्रिमिअर कंपनीतून रसायनाची गळती होवून रसायन रस्त्यावर आल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पूर्व विदर्भातील ग्रामीण भागातील अनेक तमाशा लोककलावंत शासकीय मानधनापासून वंचित असल्याबाबत

(३६) २११३५ (१६-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील ग्रामीण भागातील अनेक तमाशा लोककलावंत शासकीय मानधनापासून वंचित आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोककलावंत व शाहीर आणि इतर वाद्य वाजविणारे कलावंतांना पुरेसे मानधन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाकडे लोककलांवताना शासकीय मानधन मिळण्याबाबतचे प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पूर्व विदर्भातील लोककलांचे जतन करणेकरिता शासनाने कोणत्या योजना आखल्या आहेत वा आखण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. दि. १५ ऑगस्ट, २०१४ पासून राज्यातील सर्व पात्र कलावंतांच्या मानधनात दीडपटीने वाढ करण्यात आली आहे.

(३) संचालनालयाकडे प्राप्त प्रस्तावाबाबत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(४) लोककला पथकांना अनुदान योजना, लोककलांचे सर्वेक्षण व वृध्द कलावंत मानधन योजना यासारख्या विविध योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईच्या खाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

(३७) २१२३४ (३१-०७-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली व इतर औद्योगिक वसाहतींमधून सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया न करता हे सांडपाणी उल्हास नदीत सोडण्यात येते याला प्रतिबंध बसण्यासाठी उल्हास नदीच्या पात्रात

सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत असे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशीच परिस्थिती नवी मुंबई क्षेत्रातील खाड्यांची आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार नवी मुंबईच्या खाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२०-११-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) नवी मुंबई विभागातील खाडी परिसरात टीटीसी औद्योगिक वसाहती मध्ये एक सामूहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र असून त्याची क्षमता २७ दशलक्ष घनलिटर आहे. टीटीसी औद्योगिक वसाहती मधील उद्योगधंद्याचे सांडपाणी प्रक्रिया करुन वाशी खाडी मध्ये ७ कि.मी. आत सोडले जाते.

म.प्र.नि. मंडळामार्फत टीटीसी औद्यागिक वसाहत परिसरातील उद्योग आणि खाडी परिसराची नियमितपणे पाहणी करण्यात येत असल्यामुळे नवी मुंबईच्या खाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका तातडीने प्रकाशित करण्याबाबत

(३८) २२७०३ (३०-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मितीस सुमारे ३४ वर्षाहून अधिक कालावधी लोटला असूनही सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका प्रकाशित झाली नसल्याची बाब माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे ओ काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका तातडीने प्रकाशित करण्याबाबत शासनाकडून आजपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-११-२०१५) :(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका नसल्याने यापूर्वी निदर्शनास आले आहे.

(२) सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका प्रकाशित करणेबाबत दर्शनिका विभागाने काम हाती घेतले आहे. दि. ३०.०९.२०१५ रोजी याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय प्रमुख व तज्ञ अभ्यासक यांची बैठक घेण्यात आली असून माहिती संकलनाचे काम सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मनसर (जि.नागपूर) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव

(३९) २२८१९ (३१-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनसर (जि.नागपूर) उत्खननातील पुरावशेषांच्या संवर्धनाकरिता भारतीय पुरातत्व विभागाच्या महासंचालकांनी सुमारे ३७ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुरावशेष प्रदर्शित करण्याकरिता कोणती व्यवस्था केली आहे, तसेच मनसर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) हे खरे नाही,

मनसर, जि.नागपूर हे केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व महासंचालनालयाद्वारे राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. चालू आर्थिक वर्षात उत्खननाकरिता निधी उपलब्ध करण्यात आला नाही.

(२), (३) व (४) सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

वणी व झरी-जामणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कोळसा खाणीमुळे व त्याच्या वाहतुकीमुळे परिसरामध्ये होणारे प्रदूषण

(४०) २३४३९ (३१-०७-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), प्रा.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी व झरी-जामणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कोळसा खाणीमुळे व त्याच्या वाहतुकीमुळे सदर परिसर प्रदुषणाच्या विळख्यात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणी शहरातील रेल्वे स्टेशन लगत अनेक वर्षापासून असलेल्या कोळसा साईडींग वरील कोळशाचे ढिगारे व त्याच्या रेल्वेद्वारे होणाऱ्या वाहतुकीमुळे शहरावर व कोळशाच्या रेल्वे साईडींगमुळे रेल्वेस्टेशन लगत असलेल्या नागरिकांवर या प्रदुषणाचा विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील प्रदुषण कमी करुन सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी व सदर रेल्वे साईडींग या निवासी वस्तीपासून दूर नेण्याची शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.
(२) तालुका आरोग्य अधिकारी, वणी जि.यवतमाळ यांच्या दि. २८.०८.२०१५ रोजीच्या अहवालानुसार, हे खरे आहे.
(३) मा.राष्ट्रीय हरीत लवाद पुणे यांनी आदेश पारीत केलेला असून सदर आदेशानुसार म.प्र.नि.मंडळाने खनिज साठवणूक केंद्र व रेल्वे सायडींगच्या स्थान निश्चितीबद्दल मार्गदर्शक तत्वे दि.०४.०९.२०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे निश्चित केलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील शौचालयासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४१) २३७५६ (१४-०८-२०१५). श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषदेने शौचालयाचे बांधकाम गरजेपेक्षा जास्त केल्यामुळे निधीचा मोठा तुटवडा भासत असल्याने प्रत्येक पंचायत समितीमध्ये शेकडो संचिका निधी अभावी प्रलंबित असल्याचे दिनांक २४ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात हजारो नागरीक शौचालयाच्या अनुदानापासून लाभार्थी वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील शौचालयासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. बबनराव लोणीकर (२९-०९-२०१५) :(१) होय.
(२) होय.
(३) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत दि. २ ऑक्टोबर, २०१५ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारीत करुन रु १२.०००/- इतके करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत एकूण १३०९ ग्रामपंचायती असून दि.३१.३.२०१५ अखेर एकूण ५५,७५७ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. तसेच मार्च, २०१५ नंतर सप्टेंबर, २०१५ पर्यंत आणखी २७,५४६ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे, अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण ८३,३०३ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. त्यापैकी ३९,४३९ लाभार्थ्यांना निधीचे वाटप करण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेने सन २०१५-१६ या वर्षात रु ६४.०० कोटी एवढया निधीची मागणी शासनाकडे केलेली आहे.

नांदेड जिल्हा परिषदेस सन २०१५-१६ मध्ये (माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत राज्य हिश्श्यासाठी रु.३६६.०० लक्ष व केंद्र हिश्श्यासाठी रु.१९०८.६१ लक्ष असे एकूण रु. २२७४.६१ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. नांदेड जिल्हा परिषदेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे उपलब्धतेनुसार वितरण केले जाईल.

विदर्भात विभागस्तरावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता कार्यालय स्थापन करण्याबाबत

(४२) २५२४० (२९-०७-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे बारा मुख्य अभियंता होते, मात्र हे सर्व बारा मुख्य अभियंत्यांचे एकत्रिकरण करुन एकच मुख्य अभियंताची नेमणूक करण्यात आल्याने राज्यात सिंचनाचा असमतोल वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता कार्यालय विदर्भात विभागस्तरावर स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.मुख्यमंत्री व मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२९-०९-२०१५) :(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर मुख्य अभियंत्यांची ६ पदे मंजूर आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक ३.११.२०११ च्या आदेशान्वये ५ विभागात कामाची पुनर्रचना करुन, प्रत्येक विभागाचे कार्यक्षेत्र संपुर्ण राज्यभर करुन प्रत्येक विभागवार एक मुख्य अभियंता यांची नेमणूक करण्यात आली. तद्नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील विविध अडचणी विचारात घेऊन तसेच प्राधिकरणाचे प्रशासकीय दृष्टया कामकाज करणे सोयीचे व सुलभ होण्याकरिता, ६ प्रादेशिक मुख्य अभियंता स्वरुपाची संरचना प्राधिकरणाच्या दि. २९.४.२०१५ च्या आदेशान्वये दिनांक १.५.२०१५ पासून अस्तित्वात आणण्यात आलेली आहे. राज्यातील सिंचनाबाबतची बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित नाही.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २९.४.२०१५ च्या आदेशान्वये दिनांक १.५.२०१५ पासून ६ प्रादेशिक विभाग अस्तित्वात आले असून, त्यापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची विदर्भामध्ये नागपूर व अमरावती अशी दोन प्रादेशिक कार्यालये दिनांक १.५.२०१५ पासून अस्तित्वात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील वृध्द कलावंतांना मानधन मिळण्याबाबत

(४३) २५३७७ (३१-०७-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील जेष्ठ कलावंत श्री.शामकुमार देवीप्रसाद श्रीवास्तव यांनी वयोमान झाल्याने कला सादरीकरणाचे काम बंद केले आहे, अद्यापही त्यांना मानधन अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर जिल्ह्यातील किती वयोवृध्द कलावंत शासकीय मानधनापासून माहे मे, २०१५ अखेरपर्यन्त वंचित आहेत, उक्त मानधन त्यांना केव्हापर्यन्त मिळणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) श्री.शामकुमार देवीप्रसाद श्रीवास्तव यांनी "कलावंत मानधना" करीता विहीत नमुन्यात जिल्हा परिषदेकडून अर्ज केलेला नाही. त्यामुळे त्यांना मानधन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) अहमदनगर जिल्ह्यातील ११७३ नियमित पात्र कलावंतांना जून, २०१५ अखेर मानधनाचे वाटप झाले असून नवीन पात्र १२० कलावंतांना मानधन देण्याबाबत शासन स्तरावर उचित कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे मे, २०१५ अखेर कलावंत शासकीय मानधनापासून वंचित आहेत, असे म्हणणे योग्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील राजा केळकर संग्रहालय बावधन येथील जागेत स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव

(४४) २५५२३ (०६-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील राजा केळकर संग्रहालय बावधन येथील सहा एकराच्या प्रशस्त जागेत स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव गत १३ वर्षांपासून निधीअभावी प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळकर संग्रहालयाला देखभाल व दुरुस्तीसाठी राज्य शासनाकडून देण्यात येणारा निधी अपुरा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) नाही. ही बाब शासनास आधीच ज्ञात आहे.
(२) शासनाकडून संग्रहालयाला देखभाल व दुरुस्तीसाठी अनुदानाऐवजी वार्षिक व्यवस्थापन अनुदान रु. ५५.०० लाख एवढे देण्यात येते. यात वाढ करावी अशी संग्रहालय मागणी करत असते. मात्र संग्रहालयाने त्यांच्या गरजानुरुप अन्य स्त्रोतातून निधी उभारणे ही संग्रहालयाची जबाबदारी आहे. सबब शासनाकडून देण्यात येणारा निधी अपुरा आहे, ही संग्रहालयाची भूमिका योग्य नाही.

(३) वार्षिक व्यवस्थापन अनुदानात शासन वेळोवेळी वाढ करीत असते. प्रचलित वार्षिक व्यवस्थापन अनुदान सन २०१३-१४ पासून रु. ३५.०० लक्ष वरुन रु. ५५.०० लक्ष करण्यात आले आहे. याशिवाय संग्रहालयाच्या इमारत भाडे व कराप्रित्यर्थ दरवर्षी रु.३.९२ लाख एवढे अनुदान वितरीत करण्यात येते.

(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ताम्रपार्णी नदीत अनेक गावाचे सांडपाणी सोडल्याने नदी प्रदूषित झाल्याबाबत

(४५) २५५४५ (३१-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ताम्रपार्णी नदीत अनेक गावाचे सांडपाणी सोडल्याने नदी प्रदूषित झाल्याचे माहे मे,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदी प्रदूषित होवू नये म्हणून मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी,चंदगड यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१६-११-२०१५) :(१) व (२) अंशत: खरे आहे,

ताम्रपर्णी नदीत काही प्रमाणात सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण होत असल्याचे आढळून आले आहे,

(३) व (४) ताम्रपर्णी नदीतील सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

नवी मुंबई येथील प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनाबाबत

(४६) २५६४३ (३१-०७-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील नेरुळ ते दिघा दरम्यान पसरलेल्या डोंगर रांगातून दगडखाणीतून मोठ्याप्रमाणात उत्खनन चालु असल्यामुळे या भागामध्ये धुळीचे प्रमाण वाढले असून श्वसनाचे आजार वाढलेले आहे, त्याचप्रमाणे दिवा ते दिवाळे पर्यंत असलेल्या खाडी किनारी ठाणे व मुंबई महापालिकेच्या मल:निसारण वाहिन्यातील दुषित पाणी व कारखान्यातील दुषित पाणी सोडले जात असल्याने प्रदुषणाचा धोका मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असल्याचे माहे जून, २०१५

मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी होणारे प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत वा येणार आहेत, त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-११-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दि महा, स्टेट को.ऑप मार्केटिंग फेडरेशन येथे कार्यरत असून त्यांनी हंगामी, कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या इतर कर्मचा-यांप्रमाणे सेवेत कायम करण्याची मागणी

(४७) २५७६८ (०५-०९-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्दार पोहोच योजनेतील दहा वाहन चालक सन १९९८-९९ पासून दि महा स्टेट को.ऑप मार्केटिंग फेडरेशन येथे कार्यरत असून त्यांनी हंगामी, कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या इतर कर्मचा-यांप्रमाणे सेवेत कायम करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्दार पोहोच योजनेत काम करणा-या चालकांची इतर कर्मचा-यांप्रमाणे जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी बदल्या केलेल्या आहेत, त्याचबरोबर त्यांना निवडणूक कामासाठी जिल्हाधिका-यांनी कर्तव्यावर घेतलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११ एप्रिल, २००० दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ प्रमाणे भूकंप पुनर्वसन कार्यक्रम आणि सामाजिक वनीकरण विभागातील कर्मचा-यांच्या धर्तीवर उक्त कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (२०-११-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) द्वार वितरण योजनेअंतर्गत राज्यातील अवर्षण प्रवण व आदिवासी विकास क्षेत्रातील रास्त भाव दुकानांना अन्नधान्याची वाहतूक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळ या संस्थांना अभिकर्ता संस्था नेमण्यात आलेले आहे. या कामासाठी या संस्थांना शासनाकडून वाहने पुरविण्यात आलेली होती. या वाहनांचे भाडे शासनाकडून अदा करण्यात येते. या वाहनांसाठी संस्थांकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक नेमण्यात आलेले आहेत. बीड जिल्ह्यातील सदर १० वाहनचालक या पध्दतीचा भाग आहेत.

राज्य शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारित धान्य वितरण पध्दतीनूसार जिल्हास्तरावर एकाच कंत्राटदाराकडून दोन्ही टप्प्यातील वाहतूक केली जाणार आहे. त्याअनुषंगाने बीड सहीत अन्य १३ जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे. सुधारित धान्य वितरण प्रणाली ज्या जिल्ह्यात लागू होणार त्या जिल्ह्यातील द्वार वितरण योजना आपोआप संपुष्टात येणार आहे.

त्यामुळे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या या वाहन चालकांना शासनाने सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद् भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात स्वतंत्र असा "राज्य सांस्कृतिक निधी" स्थापन करण्याबाबत

(४८) २५८८९ (०६-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे सांस्कृतिक धोरण अस्तित्वात येऊन त्यात अनेक महत्वपूर्ण योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत व दर पाच वर्षांनी सदर धोरणाचा आढावा घेण्यात येईल आणि त्यात आवश्यकतेनुसार फेरबदल करण्यात येतील असे धोरणात नमूद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सांस्कृतिक उपक्रम आणि धोरण मसुदात नमूद न केलेल्या योजनांच्या पूर्ततेसाठी अर्थसंकल्पातील तरतुदींच्या जोडीने राज्य शासनाचा स्वतंत्र असा "राज्य सांस्कृतिक निधी" स्थापन करण्यात येईल असे सांस्कृतिक धोरणात नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोरणातील योजनांची अंमलबजावणी संथगतीने झालेली असून अर्थसंकल्पात निधीही अत्यल्प प्रमाणात उपलब्ध करण्यात आलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त सांस्कृतिक धोरण जाहिर करुन पाच वर्षाचा कालावधी झालेला असल्यामुळे आता त्याचा आढावा घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्यातील कोणत्या योजनांची अंमलबजावणी झालेली आहे, कोणत्या योजनांची अंमलबजावणी झालेली नाही, त्याची कारणे काय आहेत व गत पाच वर्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व आढावा घेण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) केवळ शासकीय तरतूदीमधून सहजरित्या राबविता न येणाऱ्या योजना/उपक्रम राज्य सांस्कृतिक निधीतून राबविले जातील. असे सांस्कृतिक धोरणात नमूद आहे.

(३) हे खरे नाही.
(४) आढावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जालना शहरातील स्टील कंपन्यांकडून होत असलेले प्रदुषण

(४९) २७४८४ (३१-०७-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरातील स्टील कंपन्या मोठया प्रमाणात प्रदुषण करीत असल्याबाबत तेथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शहरातील नागरीकांना सदर कंपन्यांच्या प्रदुषणामुळे श्वसनाचे व दम्याचे विकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) लोखंडी ठोकळे बनविणाऱ्या उद्योगांकडे सद्य:स्थितीत प्राथमिक स्वरुपाची प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित असून त्यास अधिक सक्षम करण्याकरिता महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने वरील सर्व उद्योगांना व्दितीय स्वरुपाची प्रदूषण नियंत्रण यंत्रणा दिनांक ३०/११/२०१५ पूर्वी कार्यान्वित करण्याबाबत दिनांक २३/९/२०१५ रोजी निर्देश देऊन रु. २० लक्षची बँकहमी घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथील पुरातन चैत्यगृहाचे जतन व उत्खनन करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(५०) २७५१४ (०६-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर (ता.जि.उस्मानाबाद)येथील पुरातन चैत्यगृहाला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी सन २००८-०९ मध्ये रु.३१,९०,५७५/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन रु.२४,९०,१९८/- इतक्या रकमेचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्तूपाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सहायक संचालक पुरातत्व विभाग औरंगाबाद यांनी पाहणी करुन सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येत असून या कामाकरिता

सन २०१५-१६ करीता निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे काय व निधी केव्हापर्यंत वितरीत होईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :(१) होय.
(२) व (३) स्तुप, तेर, ता.जि.उस्मानाबाद राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्ती कामाच्या रु.२७,७५,८३४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक १४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.